CMYK

लातुरात १३ व्या राज्यस्तरीय वीरशैव लिंगायत वधू - वर परिचय मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद >> पान 2

शिंदे सरकारचे दिवस संपत आले : खा. राऊत यांची जोरदार टीका >> पान 3

मेहकर नगरपरिषद निवडणूक: किशोर गारोळे यांचा सामाजिक कार्यातून प्रभाव, नगराध्यक्ष पदासाठी जबरदस्त तयारी >> पान 4

**सुविचार**

संयम हा यशाचा मार्ग आहे.


दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 84 ■ सोमवार, दि. 27 ऑक्टोबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



राष्ट्रध्वजाचा अपमान टाळण्यासाठी विराट कोहलीने केलेल्या कृतीचे अनेकांनी केले कौतुक

आतील पान

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कधीच बंद करणार नाही : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक आपला विदर्भ**

**सातारा/प्रतिनिधी** :मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेद्वारे दर महिन्याला पात्र लाभार्थी महिलांना १५०० रुपये दिले जातात. ऑक्टोबरच्या हप्त्याचे १५०० रुपये कधी मिळणार याकडे राज्यातील पात्र लाभार्थी महिलांचे लक्ष लागले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. फडणवीस यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कधीच बंद करणार नाही, असं म्हटलं आहे. ते फलटण येथील कार्यक्रमात बोलत होते.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, आपलं जे महायुतीचं सरकार आहे ते विकासाचा विचार करणारं सरकार आहे.आम्हाला समाजातील प्रत्येक व्यक्तीचा विकास हवाय. या महाराष्ट्रातील दुष्काळी भाग आहे त्यातला दुष्काळ आम्हाला दूर करायचा आहे. आमच्या शेतकऱ्यांना त्या ठिकाणी आम्हाला मदत करायची आहे. आपण बघा महाराष्ट्रतल्या शेतकऱ्यांवर संकट आल्यानंतर आजपर्यंतच्या इतिहासातील सर्वात मोठं पॅकेज ३२ हजार कोटी रुपयांचं पॅकेज त्या ठिकाणी आम्ही शेतकऱ्यांकरता दिलं आणि आज शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जाणं देखील सुरु झालं आहे. कुठल्याही परिस्थितीत आम्ही सुरु केलेल्या योजना कधीच बंद होऊ देणार नाही. सातत्यानं काही लोकं सांगतात,लाडकी बहीण योजना बंद होणार, मी तुम्हाला सांगतो, जोपर्यंत देवाभाऊ आहे, शिंदे साहेब आहेत, अजित दादा आहेत, तोपर्यंत लाडकी बहीण योजना आम्ही कधीच बंद होऊ देणार नाही, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

आमच्या लाडक्या बहिणींना दिवाळीची भाऊबीज आहे ती सातत्यानं मिळत राहील, हा विश्वास देतो, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. आमच्या शेतकऱ्यांना वीज सवलत आम्ही दिलेली आहे. विजेचं बिल जे माफ केलेलं आहे, पाच वर्ष आमच्या शेतकऱ्यांना विजेचं कुठलंही बिल भरावं लागणार नाही, हे पुन्हा एकदा सांगतो, असं देवेंद्र



फडणवीस म्हणाले. पाच वर्षांनी तुम्ही आमचं कॉन्ट्रॅक्ट तुम्ही रिन्यू केला तर अजून पाच वर्षापर्यंत तुम्हाला सवलत देऊ, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. आतातरी पाच वर्षापर्यंत वीज सवलत ठेवलेली आहे. सौरऊर्जाकरण करतोय, त्यानंतर २०२६ च्या डिसेंबरमध्ये काम पूर्ण झाल्यानंतर आमच्या शेतकऱ्यांना ३६५ दिवस, दिवसा १२ तास वीज आणि मोफत वीज दिल्याशिवाय राहणार नाही, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. आमच्या सगळ्या उपसा सिंचन योजना सोलरवर टाकणार आहोत. आमच्या उपसा सिंचन योजनांना सोलरची वीज मिळाल्यानं सातत्यानं बील भरलं नाही म्हणून जे संकट येतं त्या उपसा सिंचन योजनांना देखील संकटातून बाहेर काढण्याचं काम राज्य सरकार म्हणून आम्ही करणार आहोत, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## पुढच्या आठवड्यात पुन्हा पावसाचा अंदाज; हवामान खात्याचा इशारा

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** :राज्यात आणि देशात पुन्हा एकदा पावसाचं आगमन होणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने दिलाय. पुढच्या आठवड्यात दक्षिण आणि पूर्व भारतात जोरदार पाऊस, विजांचा कडकडाट आणि वादळी वारे वाहण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रातल्या काही जिल्ह्यांसाठी तर हवामान विभागानं 'पिवळा अलर्ट' जारी केलाय. हवामान खात्याच्या माहितीनुसार, कोकण, गोवा, गुजरात, मध्य प्रदेश आणि विदर्भातील काही भागात जोरदार सरींची शक्यता आहे. तसेच धुळे, नंदुरबार, सांगली, सोलापूर, अमरावती आणि बुलढाणा या भागात विजांसह वादळी पाऊस आणि वाऱ्यांचा जोर वाढू शकतो. या जिल्ह्यांत दोन ते तीन दिवस पावसाचा जोर कायम राहणार आहे.

दक्षिण किनारपट्टी भागात तुफानी वारे वाहण्याचा अंदाज : ३० ऑक्टोबर



ते ५ नोव्हेंबर या काळात बंगालच्या उपसागरात आणि दक्षिण किनारपट्टी भागात घनदाट ढग आणि तुफानी वारे वाहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवलाय. त्यामुळे दक्षिण भारतात पुन्हा एकदा मुसळधार पावसाची परिस्थिती तयार होण्याची शक्यता आहे. सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यांत महाराष्ट्रात पावसाने अक्षरश: धुमाकूळ घातला होता. राज्यातल्या १३ जिल्ह्यांत साधारणपेक्षा दुप्पट म्हणजे २०० टक्क्यांहून अधिक पाऊस झाला होता. छत्रपती संभाजीनगर विभागात तर तब्बल २१९ टक्के पावसाची नोंद झाली होती. त्यामुळे अनेक भागांत पूरस्थिती, रस्ते बंद, पिकांचं नुकसान, घरं पाण्याखाली जाणं अशा अडचणी निर्माण झाल्या होत्या. यामुळे पुराच्या पाण्याच्या जोरदार तडाख्याने नदी ओढ्यांचे पूल वाहून गेल्यामुळे रस्ते बंद झाले होते. तसेच पुराचे पाणी शेतांमध्ये भरून राहिल्यामुळे पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे.

शेतकऱ्यांना सावध राहण्याचं आवाहन : आता पुन्हा अशाच प्रकारचा अंदाज असल्यामुळे हवामान खात्याने नागरिकांना आणि शेतकऱ्यांना सावध राहण्याचं आवाहन केलंय. कमी उंचीच्या भागात पाणी साचू शकतं, त्यामुळे नागरिकांनी काळजी घ्यावी, घराबाहेर पडण्याआधी हवामानाचा अलर्ट बघावा, असं सांगण्यात आलंय. शेतकऱ्यांनी पिकं वाचवण्यासाठी तातडीचे उपाय करावेत आणि समुद्रकिनाऱ्याजवळ राहणाऱ्यांनी उंच लाटा आणि वादळाचा धोका लक्षात घेऊन समुद्रात जाणं टाळावं, असा इशारा हवामान खात्याने प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिला आहे.

## क्रूझरची एसटी बसला भीषण धडक; अपघातात सांगलीतील दोन भाविक ठार, सहा गंभीर जखमी

**दैनिक आपला विदर्भ**

**अमरावती/प्रतिनिधी** : सांगली जिल्हातील ७ भाविक शेगाव इथून दर्शन करून पचमढीला जाताना भीषण अपघात झाला. भाविकांच्या भरधाव क्रूझरनं एसटी बसला मागच्या बाजूनं जबर धडक दिली. हा भीषण अपघात परतवाडा शहरालगत येणी पांढरी या गावाजवळ शनिवारी दुपारी घडला. या अपघातात क्रुझरमधील दोघांचा जागीच मृत्यू झाला, तर ६ जण गंभीर जखमी झाले आहेत. आप्पासा अतगरे (वय ४० वर्षे) व दस्तगीर बाबुराव मुलाने (वय ५५ वर्षे) असं अपघातात ठार झालेल्या भाविकांची नावं आहेत.

शेगाव इथं संत गजानन महाराजांचं दर्शन घेतल्यावर हे भाविक पचमढीला निघाले होते. परतवाडा जवळ झालेल्या अपघातात सुखदेव सरगर (वय ५० वर्षे), प्रमोद जगताप (वय ४० वर्ष), प्रमोद जगताप (३३ वर्षे), मुकेश देशपांडे (वय ६० वर्ष), बिरोबा जवीर (३५ वर्ष), महेश माहुलकर (वय ४२ वर्षे) यांचा समावेश आहे. क्रुझर वाहनाचा चालक आप्पासा अतगरे (वय ४० वर्षे) व दस्तगीर बाबुराव मुलाने (वय ५५ वर्षे) यांचा जागेवरच मृत्यू झाला. एक व्यक्ती वगळता सर्व जखमी हे आमेवाडी ता. आटपाडी, जि. सांगली येथील रहिवासी आहेत. मध्यप्रदेश येथील पचमढी इथं हे भाविक दर्शनाला निघाले होते.

शनिवारी दुपारी शेगाव इथून गजानन महाराजांचं दर्शन करून ही सर्व मंडळी निघाली होती. अमरावती येथील महेश माहुलकर ही व्यक्ती लिफ्ट घेऊन या वाहनात बसल्याची प्राथमिक माहिती सूत्रांनी दिली आहे. ओव्हरटेक करण्याच्या बेतात असताना क्रूझर गाडी एसटी बसला मागून धडकली अशी प्राथमिक माहिती स्थानिकांनी दिली आहे. या अपघाताचा तपास सुरू आहे. अपघातातील जखमींना उपचारासाठी अमरावतीला हलविण्यात आलं, असं परतवाडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक देठे यांनी सांगितलं आहे.

## खा. प्रणिती शिंदे यांनी घेतली मयत डॉ. संपदा मुंडे यांच्या कुटुंबियांची भेट



**दैनिक आपला विदर्भ**

**बीड/प्रतिनिधी** : काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी आज मयत डॉ. संपदा मुंडे यांच्या कुटुंबियांची भेट घेतलीय. बीडच्या वडवणी तालुक्यातील कवडगाव येथे जाऊन त्यांनी ही भेट घेतली आहे. यावेळी प्रणिती शिंदे यांनी मुंडे कुटुंबियांशी संवाद साधत विचारपूस करत सांत्वन केले आहे. दरम्यान, संपदा मुंडे यांना न्याय मिळवून देण्यासाठी मी आपल्या सोबत आहे, असा शब्द देखील त्यांनी यावेळी दिला.

## पक्षाला ताकद देतील असे नेते सोबत घेऊन निवडणुकीला सामोरे जाणार - पंकजा मुंडे




**दैनिक आपला विदर्भ**

**बीड/प्रतिनिधी** : पक्षाला ताकद देतील असे नेते सोबत घेऊन येणाऱ्या निवडणुकीला मी सामोरे जाणार आहे. त्याचबरोबर डॉ. संपदा मुंडे आत्महत्या प्रकरणात जो कोणी दोषी असेल त्याच्यावर कडक कारवाई होईल. मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी देखील चर्चा केली आहे. मी स्वतःहून कुणाच नाव घेणार नाही. असं म्हणत भाजपच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी येणाऱ्या होऊ घातलेल्या निवडणुकीसह डॉक्टर संपदा मुंडे आत्महत्या प्रकरणावर आपली प्रतिक्रिया दिली आहे.

## डंपरचा ब्रेक फेल झाल्याने अपघात, सात दुचाकींचे नुकसान

**भिवंडी/प्रतिनिधी** : भिवंडी शहरातील गायत्री नगर, रामनगर परिसरातील डम्पिंग ग्राउंड येथे आज सकाळी (किंवा दुपारी घटनेचा वेळ अधिकृतपणे स्पष्ट नाही) एक गंभीर अपघात घडला.







CMYK

>> पान २

## संत शिरोमणी नामदेव महाराज

संत शिरोमणी नामदेव महाराज यांची काल २६ ऑक्टोबर रोजी जयंती होती. संत शिरोमणी नामदेव महाराज यांचा जन्म २६ ऑक्टोबर १२७० रोजी हिंगोली जिल्ह्यातील नरसी गावात एका गरीब शिंपी कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाम दामाशेठी तर आईचे नाव गोनाई असे होते. त्यांना एक बहिणही होती तिचे नाव आऊबाई असे होते. वयाच्या ११ व्या वर्षी त्यांचा विवाह राजाबाईशी झाला. त्यांना चार मुले व एक मुलगी होती. मुले, मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार असणारे नामदेव महाराज मात्र विठ्ठल भक्तीत लिन असायचे. लहानपणापासूनच नामदेव विठ्ठलमय झाले होते. विठ्ठल हेच त्यांच्यासाठी सर्वकाही होते. देव, आईबाप, गुरू, सखासोयरा, स्वामी तोच होता. विठ्ठल भक्तीत ते इतके लिन असायचे की साक्षात विठ्ठल त्यांना भेटायला यायचे असे म्हटले जाई. त्यांच्या हट्टापायी विठ्ठलाने त्यांच्या घरी येऊन दुधाच्या नैवेद्याचे सेवन केले होते अशी आख्यायिका प्रसिद्ध आहे. एकदा एका कुत्र्याने त्यांच्या घरी येऊन रिकामी वाटी पळवली तेंव्हा तेंव्हा कुत्र्याला भूक लागली असून वाटीत तर काहीच नाही म्हणून ते कुत्र्याच्या मागे सुकी भाकर आणि तुपाची वाटी घेऊन त्याला देण्यासाठी त्याच्या मागे धावत होते. लहानवयातच सर्वांभूती परमेश्वर ही भावना त्यांच्यात दिसून आली. लहानपणापासूनच विठ्ठलाचे भक्त असलेल्या नामदेवांनी सत्य समजून घेण्यासाठी वेदज्ञ ब्राह्मणांकडे हेलपाटे मारले पण नामदेव हे शूद्र जातीचे असल्याने त्यांना ब्रह्म जाणून घेण्याचा अधिकार नाही असे सांगून त्यांना ज्ञान घेण्यापासून रोखण्यात आले. तेंव्हा त्यांनी भक्तीतून थेट परमेश्वरलाच आधार मानून स्वतःच बुद्धीचा कस लावत विश्वाचे सत्य समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्याचाच एक भाग म्हणून ते लंगोटी नेसून चंद्रभागेच्या वाळवंटात कीर्तन करत सदविचारांचा प्रसार करू लागले. ही वाट त्यांना स्वतःच शोधायची होती. त्यातून साधनेची नवीनवी साधनं निर्माण होऊ लागली. श्रोत्यांनाही समजून घेणारी वारकरी सामूहिक कीर्तनाची मुहूर्तमेढ त्यांनीच रोवली. त्यासाठी त्यांनी अभंग या छंदाची निर्मिती केली. नामदेवांनीच वारकऱ्यांच्या लाडक्या काल्याच्या कीर्तनाची सुरुवात केली. नामदेव महाराजांना अभंग लेखनाचा इतका छंद जडला की त्यांनी जवळपास १ कोटी अभंग लिहिले. याचाच अर्थ त्यांनी विपुल साहित्य लेखन केले. त्यांच्या साहित्याची भाषा खूप सोपी होती. ज्ञानेश्वर, मुक्ताबाई, चांगदेव या त्यांच्या समकालीन संतांच्या तुलनेत आज आपल्याला त्यांची भाषा लगेच कळते. त्यांनी कायम सर्वसामान्यांसाठी लिहिले. त्यात संवाद आहे. नाट्य आहे. लोककलांचे विविध प्रकार आहे. ज्ञानेश्वरांच्या समाधी नंतरही नामदेवांनी तीर्थयात्रा करून रामेश्वरापासून मुलतान पर्यंतचा भारत पालथा घातला. जे जिथे गेले तिथले बनले. त्यांनी तिथल्या स्थानिक भाषेत लोककाव्य लिहिले. त्यांनी हिंदी साहित्याला नवा आयाम दिला. त्यांच्या कामातूनच पुढे रामानंद, कबीर, नानक, दादू दयाळ, मीरा, नरसी मेहता अशी संताची मांदियाळी देशभर उभी राहिली. पंजाबात तर ते दोन दशकांहून अधिक काळ राहिले. शीख धर्माच्या गुरु ग्रंथासाहेब या पवित्र ग्रंथात त्यांची ६१ पदे समाविष्ट आहेत. पंजाबात आजही त्यांच्या अभंगाचे नियमित वाचन केले जाते. पंजाबातच नाही तर संपूर्ण देशात त्यांना मानणारा मोठा वर्ग आहे. महाराष्ट्र आणि पंजाब बरोबरच राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, हरियाणा, उत्तराखंड, उत्तरांचल, हिमाचल प्रदेश या राज्यात त्यांची मंदिरे आहेत. तामिळनाडू पासून काश्मीरपर्यंत लाखो लोक त्यांचे नाव किंवा आडनाव किंवा जातीची ओळख अभिमानाने मिरवतात. संपूर्ण देशात प्रभाव असणारे नामदेव हे एकमेव संत आहेत म्हणूनच त्यांना संत शिरोमणी असे म्हणतात. ३ जुलै १३५० रोजी वयाच्या ८० व्या वर्षी अत्यंत समाधानाने आपला देह ठेवला. त्यांची एक समाधी पंढरपुरात विठ्ठलाच्या पायरीशी आहे तर दुसरी पंजाबमधील घुमान येथे आहे. या समाधीचे दर्शन घेण्यासाठी दररोज हजारो भाविक मोठ्या भक्तिभावाने या ठिकाणी येतात आणि नतमस्तक होतात.

# लातुरात १३ व्या राज्यस्तरीय वीरशैव लिंगायत वधू - वर परिचय मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक आपला विदर्भ**

**लातूर/प्रतिनिधी :** वीरशैव लिंगायत समाज बांधव लातूर तर्फे लातुरात रविवारी (दि. २६ ऑक्टो.) आयोजित करण्यात आलेल्या १३ व्या राज्यस्तरीय वीरशैव लिंगायत वधू - वर परिचय मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. राज्याच्या कानाकोपऱ्यातून उप वधू - वर - त्यांच्या पालकांनी मोठ्या संख्येने मेळाव्यात आपली उपस्थिती नोंदवून मेळावा यशस्वी करण्याकामी संयोजकांना सहकार्य केले.




हा मेळावा वीरशैव समाज सांस्कृतिक भवनमध्ये पार पडला. मागच्या सलग १३ वर्षांपासून वीरशैव लिंगायत समाज बांधव लातूरच्या वतीने अशा प्रकारचा वधू - वर परिचय मेळावा आयोजित करण्यात येतो. या मेळाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे मेळाव्यात वधू वरांची नाव नोंदणी करण्यासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जात नाही. पूर्णतः निःशुल्क होणाऱ्या या मेळाव्यामुळे वीरशैव समाज बांधवांच्या समाज सेवेचा हा आगळावेगळा उपक्रम संपूर्ण राज्यात नावलौकिकास पात्र ठरला आहे. या मेळाव्याचे उदघाटन अहमदपूरच्या वीर मठ संस्थानचे पिठाधिकारी राजेश्वर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज, खा. डॉ. शिवाजी काळगे , प्रा. मनोहर धोंडे, भाजप नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे हे होते. मंचावर बसवराज धाराशिवे, बाबासाहेब कोरे, राजाभाऊ हालकुडे, बालाजी पिंपळे, सुनील भिमपुरे, गुरुनाथ मगे यांची उपस्थिती होती.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी वधू - वर परिचय मेळाव्याच्या माध्यमातून समाज एकत्रित येऊन एकाच छताखाली अनेकांच्या गाठी - भेटीही होतात. अशा प्रकारच्या मेळाव्याची आजमितीस समाजाला नितांत आवश्यकता असल्याचे सांगितले. मेळाव्यात उपस्थित राहणाऱ्या सर्वच वधू वरांचे विवाह एकाचवेळी जुळून येत नसले तरी विखुरलेल्या समाजाला एकत्रित आणण्याचे हे सर्वोत्तम माध्यम आहे, ही बाब नाकारून चालणार नाही. वीरशैव समाजाच्या हितासाठी स्थापन करण्यात आलेल्या वीरशैव महामंडळाला आवश्यक त्या प्रमाणात निधीची उपलब्धी होत नाही. समाजाच्या विकासासाठी आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी बोलून या निधीत भरीव वाढ कारण्यासाठी प्रयत्नरत असल्याचे त्यांनी सांगितले. आज समाजात विवाह जुळले, व्यवस्थित पार पडले तरी घटस्फोटाचे प्रमाणही वाढल्याचे निदर्शनास येत आहेत. ही बाब कोणत्याही समाजासाठी चांगली नाही. त्याकरिता विवाहानंतर पती - पत्नीने परस्परांना समजून घेणेही तेवढेच महत्वाचे असते. एकमेकांना समजून घेतल्याशिवाय नात्यात प्रेम, आपुलकी निर्माण होऊ शकत नाही. एकमेकांसोबतचा संवादच सुखी संसारासाठी महत्वाचा असतो,असेही डॉ. चाकूरकर यांनी सांगितले.

खा. डॉ. शिवाजी काळगे यांनी यावेळी बोलताना वीरशैव लिंगायत समाज बांधव लातूरच्या वतीने नियमितपणे आयोजित केल्या जाणाऱ्या वधू वर परिचय मेळाव्याच्या माध्यमातून समाज सेवेबरोबरच समाज संघटनाचे कामही तेवढ्याच तन्मयतेने केले जात असल्याचे सांगितले. चांगल्या विचाराने सगळी मंडळी एकत्रित आल्यास समाजही संघटित होऊन प्रगती साधू शकतो. आजचे युग सोशल मिडियाचे आहे. या सोशल मिडीयाचा उपयोगही चांगल्या कार्यासाठी करून घेण्याचा रवांनी प्रयत्न करावा असे सांगून खा. डॉ. काळगे यांनी या मेळाव्याच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल संयोजकांचे कौतुक केले. बसवराज धाराशिवे यांनी आपले विचार व्यक्त करतांना समाज बांधव म्हणून आपण वेगवेगळ्या ठिकाणी वास्तव्य करत असलो तरी समाज एकत्रित येण्यासाठी आणि आपलेपणाची भावना कायम राहण्यासाठी अशा प्रकारचे मेळावे नियमितपणे होणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले.

वीर मठ संस्थानचे पिठाधिकारी राजेश्वर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज यांनी आपल्या आशीर्वचनात वीरशैव धर्म इष्टलिंग आहे. आपण कोठेही असलो तरी आपले आचार विचारांपासून परावृत्त होता कामा नये असे सांगितले. वीरशैवच नव्हे तर सर्वच समाजातील मुलांवर सध्यस्थितीत चांगले संस्कृ होणे आवश्यक झाले आहे. संस्काराशिवाय जीवनाला काहीच अर्थ उरत नाही. जीवनामध्ये सुखी संसारालाही अनन्यसाधारण असे महत्व आहे. नवविवाहित जोडप्यांना सुखी संसाराची गणिते समजावून सांगावीत पण, माता - पित्यानी त्यांच्या संसारात अधिकची लुडबुड करू नये असा सल्लाही त्यांनी आपल्या आशीर्वचनातून उपस्थितांना दिला. अध्यक्षीय समारोपात प्रा. मनोहर धोंडे यांनी विनाशुल्क वधू वर परिचय मेळाव्याचे आयोजन ही काळाची गरज असल्याचे सांगितले. हा उपक्रम मागच्या १३ वर्षांपासून अविरतपणे राबविणाऱ्या वीरशैव समाज बांधव लातूरच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे. वीरशैव हा प्राचीन धर्म आहे, जात नाही. जो कपाळावर विभूती लावतो, लिंग धारण करतो, भगवान शंकराला मानतो तो वीरशैव आहे. आज आंतर जातीय विवाहाचे प्रमाणही वाढले आहे. पण आंतर जातीय विवाहामुळेही समाजात घटस्फोटाचे प्रमाण वाढत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. कोणाचीही श्रीमंती ही पैसा - मालमत्तेवर न मोजली जाता ती मुलांवर केल्या जाणाऱ्या संस्कारावर मोजली जाणे आज गरजेचे बनले आहे. मुलांवर चांगले संस्कृ असतील तरच भावी पिढी सशक्त, नैतिकतेला अनुसरून चालणारी घडणार आहे. त्याकरिता आई वडिलांनी मुला - मुलींवर चांगले संस्कृ करावेत अशी अपेक्षाही प्रा. धोंडे यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमाचे प्रास्तविक, सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन मेळाव्याचे मार्गदर्शक उमाकांत कोरे यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी या मेळाव्याच्या आयोजनामागची भूमिकाही सविस्तरपणे विशद केली. मागच्या १३ वर्षांपासून वीरशैव लिंगायत समाजाच्या हिताच्या दृष्टीने, उप वधू - वरांच्या विवाहासाठी पालकांना अधिकची पायपीट करायला लागू नये, एकाच छताखाली त्यांना हवी तशी एकापेक्षा अधिक स्थळे पाहता यावीत हा यामागचा मूळ उद्देश्य आहे. समाज बांधवाना कोणतीही आर्थिक झळ बसता कामा नये या उद्देशाने मेळाव्याच्या नाव नोंदणी साठी कोणत्याही प्रकारचे शुल्क न आकारण्याचा निर्णय सुरुवातीलाच घेतला. तो आजमितीपर्यंत पाळत सर्वांच्या सहकार्याच्या बळावर मेळावा आयोजित केला जत असल्याचेही उमाकांत कोरे यांनी सांगितले. या मेळाव्यात दोन हजारांहून अधिक वधू वरांची नोंदणी झाली.

मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी उमाकांत कोरे, अभिषेक ( तम्मा ) चौंडा, नागेश कानडे, बसवराज धाराशिवे, राजाभाऊ हालकुडे, दिलीप होनराव, पवनकुमार कल्याणी, बालाजी पिंपळे, बसवेश्वर हालकुडे, सुनील भिमपुरे, शिवराज बुरांडे, सतीश कानडे, विश्वनाथ राचट्टे, प्रशांत बोळेगावे, महेश कोळळे, वैभव विभुते, मल्लिकार्जुन पेद्दे, यांसह अनेकानी परिश्रम घेतले.

## खराब हवामानामुळे गेटवे ते मांडवा जलवाहतूक सेवा बंद; मेरिटाइम बोर्डाचा निर्णय

**रायगड/प्रतिनिधी :** खराब हवामानाचा फटका रायगड जिल्ह्यातील समुद्री वाहतुकीलाही बसला असून, मुंबई गेटवे ऑफ इंडिया ते मांडवा दरम्यानची जलवाहतूक सेवा काल संध्याकाळपासून तात्पुरती बंद करण्यात आली आहे. हवामान खात्याच्या इशाऱ्यानंतर रायगडच्या संपूर्ण किनारपट्टीवर तीन नंबरचा इशारा बावटा फडकवण्यात आला आहे. समुद्रात उंचच उंच लाटा आणि जोरदार वाऱ्यांचा वेग वाढल्याने सुरक्षेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आल्याचं जिल्हा सागरी सुरक्षा यंत्रणांकडून सांगण्यात आलं आहे.

मेरिटाइम बोर्डाकडून घेतलेल्या या निर्णयामुळे गेटवे ते मांडवा दरम्यान दररोज प्रवास करणाऱ्या शेकडो नियमित प्रवाशांसह सुट्टीचा शेवटचा दिवस एन्जॉय करून मुंबईला परतणाऱ्या हजारो पर्यटकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. बोटी बंद असल्याने अनेक पर्यटकांनी मुंबईकडे परतीसाठी रस्ते मार्गाचा पर्याय निवडला आहे. परिणामी, मुंबई-गोवा महामार्गावर तसेच पेण, वडखळ आणि अलिबाग मार्गांवर वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्या असून, महामार्गावर वाहतूक कोंडीचे चित्र दिसत आहे. काही ठिकाणी प्रवासाचा वेळ नेहमीपेक्षा दुप्पट वाढल्याचंही समजतंय.

स्थानिक कोस्ट गार्ड पथकांकडून किनाऱ्यावर गस्त : दरम्यान, जोरदार वाऱ्यांचा वेग आणि वाढलेल्या लाटांच्या पार्श्वभूमीवर सागरी सुरक्षा दल आणि स्थानिक कोस्ट गार्ड पथकांकडून किनाऱ्यांवर गस्त वाढवण्यात आली आहे. मासेमारांना खोल समुद्रात न जाण्याचा इशारा देण्यात आला असून, अनेक ठिकाणी मासेमारी नौका किनाऱ्यावरच थांबवण्यात आल्या आहेत.

# चहाशी माझा संबंध तुम्हाला माहिती आहे, पण आज मी... मन की बातमध्ये पंतप्रधान मोदींचा खास खुलासा!

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज त्यांच्या 'मन की बात' कार्यक्रमाच्या १२७ व्या भागातून देशवासीयांशी संवाद साधला. या भागाची सुरुवात त्यांनी छठ महापर्वाच्या शुभेच्छांनी केली. तसेच अभियंता कपिल शर्मांचे कौतुक देखील केले. पंतप्रधान म्हणाले, छठ हा सण भारतीय संस्कृती, निसर्ग आणि समाजातील अद्भुत ऐक्याचे प्रतीक आहे. समाजातील प्रत्येक घटक छठ घाटांवर एकत्र येतो, हे दृश्य भारताच्या सामाजिक एकतेचे सर्वात सुंदर उदाहरण आहे. ते पुढे म्हणाले की, जर संधी मिळाली तर प्रत्येकाने छठ सणात सहभागी व्हावे. गेल्या वेळेस त्यांनी स्वदेशी वस्तूंचा वापर करण्याचे आणि आत्मनिर्भर भारताच्या दिशेने पावले उचलण्याचे आवाहन केले होते.

**छठ महापर्व हे सामाजिक ऐक्याचे उत्तम उदाहरण : पंतप्रधान मोदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, छठचा हा महान सण संस्कृती, निसर्ग आणि समाज यांच्यातील खोल ऐक्याचे प्रतिबिंब आहे. समाजातील प्रत्येक घटक छठ घाटांवर एकत्र उभा आहे. हे दृश्य भारताच्या सामाजिक एकतेचे सर्वात सुंदर उदाहरण आहे.

**आज आपण चहा नाही तर कॉफीवर चर्चा करू, पंतप्रधान मोदी**

मन की बातच्या १२७ व्या भागात पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, ''तुम्हाला सर्वांना चहाशी असलेले माझे नाते माहिती आहे, पण आज मी विचार केला की मन की बातमध्ये कॉफीवरही चर्चा का करू नये? ओडिशातील अनेक लोकांनी कोरापूट कॉफीबद्दल माझ्यासोबत त्यांच्या भावना शेअर केल्या. मला सांगण्यात आले आहे की कोरापूट कॉफीची चव अद्भुत आहे, आणि एवढेच नाही; चवीपलीकडे, कॉफीची लागवड देखील लोकांना फायदेशीर ठरत आहे.'' कोरापूट हा कॉफीची आवड असलेल्या लोकांचा जिल्हा आहे. भारतीय कॉफी जगभरात वेगाने लोकप्रिय होत आहे, असे कॉफीप्रेमी म्हणतात. भारतीय कॉफी ही सर्वोत्तम आहे. ती भारतात उत्पादित केली जाते आणि जगभरात ती आवडीने प्यायली जाते.

कर्नाटकातील चिकमंगलूर, कुर्ग आणि हसन असो; तामिळनाडूतील पुलानी, शेवरॉय, निलगिरी आणि अनामलाई प्रदेश असो; कर्नाटक-तामिळनाडू सीमेवरील बिलीगिरी प्रदेश असो; किंवा केरळमधील वायनाड, त्रावणकोर आणि मलबार प्रदेश असोत, भारतीय कॉफीची विविधता खरोखरच आश्चर्यकारक आहे. मला सांगण्यात आले आहे की आपला ईशान्येकडील प्रदेश देखील कॉफी लागवडीत प्रगती करत आहे.

**पीएम मोदींनी ऑपरेशन सिंदूरवर चर्चा केली**

मन की बातच्या १२७ व्या भागात पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, ऑपरेशन सिंदूर भारतीयांसाठी गौरवाची बाब आहे. त्या पाठोपाठ आणखी एक आनंदाची घटना घडली आहे. एकेकाळी माओवादी दहशतीच्या अंधारात असलेल्या भागातही आनंदाचे दिवे पेटले आहेत. लोकांना त्यांच्या मुलांचे भविष्य धोक्यात आणणाऱ्या माओवादी दहशतीचा पूर्णपणे अंत हवा आहे.

**पंतप्रधान मोदींनी जीएसटी बचत महोत्सवाबद्दल सांगितले**

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, जीएसटी बचत महोत्सवाबद्दल लोक खूप उत्साही आहेत. या सणाच्या काळातही असेच आनंदाचे वातावरण दिसून आले. बाजारपेठेत स्वदेशी वस्तूंच्या खरेदीत प्रचंड वाढ झाली आहे. माझ्या पत्रात, मी खाद्यतेलाच्या वापरात १०ज्ञब कपात करण्याचे




आवाहनही केले आहे आणि लोकांनीही याला खूप सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

**पंतप्रधान मोदींनी अभियंता कपिल शर्माचे कौतुक केले**

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, बंगळुरू हे तलावांचे शहर म्हणून ओळखले जाते आणि अभियंता कपिल शर्मा यांनी येथील तलावांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी मोहीम सुरू केली आहे. कपिल शर्मा यांच्या टीमने बंगळुरू आणि आसपासच्या परिसरात ४० विहिरी आणि सहा तलावांचे पुनरुज्जीवन केले आहे. महत्त्वाचे म्हणजे, त्यांनी या मोहिमेत कॉर्पोरेशन आणि स्थानिक रहिवाशांनाही सहभागी करून घेतले आहे.

**भारतीय जातीचे कुत्रे दत्तक घेण्याचे पंतप्रधान मोदींचे आवाहन**

सुमारे पाच वर्षांपूर्वी, मी या कार्यक्रमात भारतीय जातीच्या कुत्र्यांवर चर्चा केली. मी आपल्या देशवासीयांना आणि आपल्या सुरक्षा दलांना भारतीय जातीच्या कुत्र्यांना दत्तक घेण्याचे आवाहन केले, कारण ते आपल्या वातावरण आणि परिस्थितीशी अधिक सहजपणे जुळवून घेतात. बीएसएफ आणि सीआरपीएफने त्यांच्या पथकांमध्ये भारतीय जातीच्या कुत्र्यांची संख्या वाढवली आहे.

**आज संपूर्ण परिसरात खारफुटीचा प्रभाव दिसून येतो.**

मन की बातमध्ये पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज संपूर्ण प्रदेशात खारफुटीचा प्रभाव दिसून येत आहे. परिसंस्थेत डॉल्फिनची संख्या वाढली आहे. खेकडे आणि इतर जलचर प्राणी देखील वाढले आहेत. शिवाय, स्थलांतरित पक्षी आता मोठ्या संख्येने येत आहेत. याचा केवळ पर्यावरणावर सकारात्मक परिणाम झाला नाही तर धोलेराच्या मत्स्यपालकांनाही फायदा होत आहे.

**३१ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या रन फॉर युनिटीमध्ये सर्व देशवासीयांनी सहभागी व्हावे.**

पंतप्रधान मोदी म्हणाले की, सरदार पटेल हे आधुनिक काळातील देशाच्या महान व्यक्तींपैकी एक होते. त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वात अनेक गुण होते. मी तुम्हा सर्वांना ३१ ऑक्टोबर रोजी, सरदार पटेल यांच्या जयंतीनिमित्त देशभरात आयोजित करण्यात येणाऱ्या रन फॉर युनिटीमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करतो.

**पंतप्रधान मोदी यांनी राष्ट्रगीत 'वंदे मातरम' वर चर्चा केली.**

पंतप्रधान मोदी म्हणाले की, ''वंदे मातरम्'' या एकाच शब्दात अनेक भावना आणि ऊर्जा आहेत. त्यामुळे आपल्याला भारतमातेची ओढ जाणवते. भारतमातेचे पुत्र म्हणून आपल्या जबाबदाऱ्यांची जाणीवही होते. अडचणीच्या वेळी, ''वंदे मातरम्'' चा जप १.४ अब्ज भारतीयांना एकतेच्या उर्जेने भरतो. आता ७ नोव्हेंबर रोजी, आपण ''वंदे मातरम्'' उत्सवाच्या १५० व्या वर्धापन दिनात प्रवेश करू. ''वंदे मातरम्'' हे गीत १५० वर्षांपूर्वी रचले होते आणि १८९६ मध्ये गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी पहिल्यांदा गायले होते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### मुंबईजवळ ड्रग्सचा कारखाना उद्ध्वस्त, १४ कोटींची ड्रग्स जप्त

दैनिक आपला विदर्भ

**वसई/प्रतिनिधी :** वसईच्या पेल्हार येथे मुंबई पोलिसांच्या झोन सहामधील अँटीनार्कोटिक्स सेल आणि टिळक नगर पोलिसांनी मिळून केलेल्या कारवाईत एका ड्रग्स फॅक्टरीचा पर्दाफाश केला आहे. पेल्हार येथील रशीद कंपाउंडमध्ये राजरोसपणे ड्रग्स बनवण्याचा कारखाना सुरू होता. महत्वाचं म्हणजे याचा मास्टरमाईड दुबईतून ड्रग्स फॅक्टरी ऑपरेट करत असल्याचे समोर आले आहे.

या प्रकरणी पोलिसांनी एका आरोपीला अटक केली असून या प्रकरणात आणखी कोणाचा हात आहे का ? याचा तपास सुरु आहे.

काही दिवसांपूर्वी टिळकनगर पोलीस ठाण्यात ड्रग्स संदर्भात एक गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याप्रकरणी तपास सुरू असताना ड्रग्सच्या कारखान्याबाबत माहिती मिळाली. माहिती मिळाल्यावर पोलिसांनी धाड टाकली. या धाडीत सात किलोपेक्षा जास्त ड्रग्सचा साठा सापडला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेक्षात याची किंमत १४ कोटी रुपये असल्याचे सांगितलं जात आहे.

ज्या ठिकाणी धाड टाकण्यात आली त्या ठिकाणापासून जवळच पोलीस स्टेशन आहे. पोलीस स्टेशन जवळ असूनही या भागात ड्रग्स फॅक्टरी सुरू होती. काही दिवसांपूर्वी जवळच असलेल्या कामन या गावात ड्रग्सची फॅक्टरी उद्ध्वस्त करण्यात आली होती. त्यानंतर आता पेल्हार येथील रशीद कंपाऊंडमध्ये ड्रग्स निर्मितीचा कारखाना सुरू होता, जो बंद करण्यात आला.

### एमपीएससी २०२६ चे वेळापत्रक जाहीर

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून (एमपीएससी) २०२६ मध्ये घेतल्या जाणाऱ्या विविध परीक्षांचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. वेळापत्रकानुसार, ५ ते ९ मे रोजी महाराष्ट्र वनसेवा मुख्य परीक्षा २०२५ होणार आहे. तर १६ मे रोजी स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०२५, महाराष्ट्र कृषी सेवा मुख्य परीक्षा २०२५ होणार आहे. या तिन्ही परीक्षांचा निकाल ऑगस्टमध्ये प्रसिद्ध होईल. १७ मे रोजी महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब सेवा संयुक्त मुख्य परीक्षा २०२५ होणार आहे, तर महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त मुख्य परीक्षा ७ जून रोजी घेण्यात येईल. दोन्ही निकाल सप्टेंबरमध्ये जाहीर होणार आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा ३१ मे रोजी होऊन ऑगस्टमध्ये निकाल जाहीर केला जाणार आहे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर आणि न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षेचा तपशील स्वतंत्रपणे जाहीर केला जाणार आहे. तसेच ३ ऑक्टोबर ते २४ ऑक्टोबर या कालावधीत राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२६ घेतली जाणार आहे. या परीक्षेचा निकाल ऑगस्ट २०२७ मध्ये जाहीर केला जाणार आहे. तसेच १५ नोव्हेंबर रोजी विद्युत अभियांत्रिकी आणि यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०२६ होऊन फेब्रुवारी २०२७ मध्ये निकाल प्रसिद्ध केला जाणार आहे. याच प्रमाणे १५ नोव्हेंबर रोजीच महाराष्ट्र कृषी सेवा मुख्य परीक्षा २०२६ आणि स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०२६ आयोजित करून निकाल मार्च २०२७ मध्ये जाहीर केला जाणार आहे.

वेळापत्रकानुसार, २१ नोव्हेंबर रोजी अन्न व औषध प्रशासन सेवा मुख्य परीक्षा २०२६, निरीक्षक वैधमापन शास्त्र मुख्य परीक्षा २०२६ आयोजित करण्यात येणार आहे, तर निकाल मार्च २०२७मध्ये जाहीर केला जाणार आहे. २६ ते ३० डिसेंबर या कालावधीत महाराष्ट्र वनसेवा मुख्य परीक्षा २०२६ आयोजित करून निकाल एप्रिल २०२७मध्ये जाहीर करण्यात येणार आहे, असे 'एमपीएससी' कडून सांगण्यात आले.

### एसटी प्रवासी महिलेकडील दागिने चोरणाऱ्या तिघी अटकेत; चार लाखांचा ऐवज जप्त

**पुणे/प्रतिनिधी :** दिवाळीत परगावी निघालेल्या एसटी प्रवासी महिलेकडील दागिने चोरणाऱ्या तीन महिलांना गुन्हे शाखेने अटक केली. त्यांच्याकडून रोकड, तसेच सोन्याचे दागिने असा चार लाख १२ हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला. आशा देविदास लोंढे (वय ६०), रेखा मनोहर हातागंळे (वय ३५) आणि हेमा दिगंबर हातागंळे (वय ४१, तिघी रा. लोणी काळभोर रेल्वे स्थानकाजवळ) अशी अटक करण्यात आलेल्या महिलांची नावे आहेत.

दिवाळीत मुंबई-पुणे रस्त्यावरील वाकडेवाडी एसटी स्थानकातून परगावी निघालेल्या प्रवाशांकडील दागिने, रोकड चोरीला गेल्याच्या घटना घडल्या होत्या. गुन्हे शाखेच्या युनिट चारकडून चोरट्यांचा शोध घेण्यात येत होता. प्रवाशांकडील ऐवज चोरणाऱ्या महिला वाकडेवाडी येथील पीएमपी थांब्यावर थांबल्याची माहिती गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने तिघींना ताब्यात घेतले. त्यांची चौकशी केली. तेव्हा त्यांनी एसटी प्रवासी महिलेच्या पिशवीतून दागिने चोरल्याची कबुली दिली.

# शिंदे सरकारचे दिवस संपत आले : खा. राऊत यांची जोरदार टीका

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी आज मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजपवर जोरदार टीका केली. सर्वोच्च न्यायालयातील खटल्याची तारीख जवळ येताच शिंदे दिल्लीकडे धाव घेतात, अशी टीका करताना त्यांनी म्हटले की ''एकनाथ शिंदे यांचे पाय लटपटायला लागले आहेत, म्हणून ते पुन्हा दिल्लीला गेले आहेत.''

राऊत म्हणाले, ''प्रत्येक वेळी सर्वोच्च न्यायालयात चिन्ह आणि पक्षाच्या निकालाची तारीख जवळ आली की शिंदे दिल्लीला जातात. बाकी सर्व प्रादेशिक पक्ष राज्यात बसून निर्णय घेतात. चंद्रबाबू नायडू सुद्धा आपल्या राज्यातच राहतात. पण शिंदेंचे मालक दिल्लीला बसले आहेत, म्हणून त्यांना तिथे जावे लागते.''

५०-५० जागांवरील राजकारणावर टीका

संजय राऊत यांनी पुढे भाजपशिंदे युतीतील जागावाटपावरूनही शिंदे यांना लक्ष्य केले. ते म्हणाले, ''एकनाथ शिंदे यांचे मुंबईत काहीच अस्तित्व उरलेले नाही. भाजप त्यांना एवढ्या जागा देणार नाही. त्यांचा पक्ष आता संपला आहे. लवकरच त्यांना आपला पक्ष भाजपमध्ये विलीन करावा लागेल. ते सर्वोच्च न्यायालयात पक्षाचा बचावही करू शकणार नाहीत. जर चोरलेल्या पक्षाला सगळे हक्क दिले गेले, तर न्यायव्यवस्थेवरील विश्वास ढळेल. मात्र, आम्हाला अजून न्यायव्यवस्थेवर पूर्ण विश्वास आहे.

राऊत म्हणाले, ''शिंदे यांनी पक्ष, बहुमत, आणि आमचा चिन्ह चोरले, आणि आता दिल्लीच्या फेऱ्या मारत आहेत. पण बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना ही नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्या शंभर पिढ्या आल्या तरी चोरू शकत नाहीत. शिंदेंच्या बेडूक उड्या सुरू आहेत, पण कोर्टाला न्याय करावाच लागेल. आम्हाला आत काय चाललंय हे सगळं माहित असतं. शिंदे यांचा पक्ष हा भाजपचा अंगवस्त्र आहे.''

काँग्रेसच्या चौकशी मागणीवर राऊतांचे विधान

देशातील बोगस मतदार यादी आणि अदानी समूहावरही राऊत यांनी सरकारवर निशाणा साधला. ते म्हणाले, ''पूर्ण देश अदानीला दिला आहे. बजेट अदानीच्या हातात दिलं गेलं आहे. आम्ही बोगस मतदार यादीविरोधात मोर्चा काढत आहोत आणि निवडणूक आयोगाने याची चौकशी सुरू करावी, अशी मागणी करतो. चौकशीची सुरुवात महाराष्ट्रातूनच व्हावी.''

राऊत यांनी सांगितले की, ''१ नोव्हेंबर रोजी मुंबईत मोठा मोर्चा काढला जाणार आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, मनसे, शेतकरी कामगार पक्ष, कम्युनिस्ट पार्टी आणि समाजवादी पक्ष या सर्वांनी या मोर्चात सहभाग नोंदवण्याचा निर्णय घेतला आहे. मोर्चाची सुरुवात फॅशन स्ट्रीटवरून होईल, आणि तो मेट्रो सिनेमा व मुंबई महानगरपालिकेपर्यंत जाईल. त्यानंतर मुख्य भाषण होईल, आणि त्यावरून पुढचा निर्णय घेतला जाईल.''

शिखर संमेलन आणि मोदींवर टीका

पत्रकार परिषदेत राऊत यांनी शिखर संमेलनावरून पंतप्रधान नरेंद्र मोदींनाही लक्ष्य केले. ते म्हणाले, ''मोदी जगभरचे महत्वाचे दौरे करतात, मग शिखर संमेलनात का उपस्थित राहिले नाहीत? त्यांना बिहार निवडणुका अधिक महत्वाच्या वाटत आहेत.''

संजय राऊत यांच्या पत्रकार परिषदेतून पुन्हा एकदा राज्यातील राजकीय तापमान वाढले आहे. त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजपवर थेट हल्ला चढवला असून, सर्वोच्च न्यायालयातील निकाल आणि येणाऱ्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग येण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी घेतली जैन मुनींची भेट: नागरिकांची जोरदार घोषणाबाजी

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** शेठ हिराचंद नेमचंद जैन दिगंबर बोर्डिंगच्या (जैन बोर्डिंग) जागेच्या विक्री व्यवहाराबाबत माजी आमदार रवींद्र धंगेकर यांच्याकडून केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर आरोप करण्यात येत आहेत. मात्र असं असताना आज मुरलीधर मोहोळ यांनी जैन बोर्डिंग इथं भेट देत आचार्य श्री गुप्ती नंदीजी यांची भेट घेतली. या भेटीनंतर माध्यमांना प्रतिक्रिया दिल्यानंतर जैन बोर्डिंग इथं उपस्थित नागरिकांनी जैन बोर्डिंगचा व्यवहार रद्द व्हावा, असं म्हणत जोरदार घोषणाबाजी केली.

मुरलीधर मोहोळ यांनी घेतली आचार्य श्री गुप्ती नंदीजी यांची भेट : आज केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी शेठ हिराचंद नेमचंद जैन दिगंबर बोर्डिंगच्या (जैन बोर्डिंग) इथं जात आचार्य श्री गुप्ती नंदीजी यांची भेट घेतली. या भेटीनंतर केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले की, ''गेल्या काही दिवसांपासून सातत्यानं मी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत असतो. पुण्याचे विषय तसेच राजकीय आणि संघटनात्मक विषयावर मी त्यांची भेट घेतो. काल झालेल्या भेटीत याबाबत कोणतीही चर्चा झालेली नाही. जैन बोर्डिंगच्या विषयात देवेंद्र फडणवीस यांची भूमिका स्पष्ट आहे. या शहराचा खासदार म्हणून माझी भूमिका काय असावी आणि जैन धर्मगुरू यांनी जे आवाहन केलं, त्या आवाहनाला प्रतिसाद देत मी आज त्यांची भेट घेतली आहे. माझ्या ओळखीचे लोक जरी या विषयात असले, तरी यात माझा काहीही संबंध नसून मी पुराव्यानिशी ते सादर केले. ही बाब मी जैन धर्मगुरू यांच्या समोर मांडली आहे. हा व्यवहार रद्द होण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजे असं, यावेळी जैन मुनी यांनी सांगितलं आहे. येत्या काळात हा विषय कसा संपेल, यासाठी मी प्रयत्न करणार आहे. लवकरात लवकर यात मार्ग काढला जाईल,'' असं यावेळी मोहोळ म्हणाले.

भारतभरातील जैन समाज ठेवणार एक दिवसीय उपवास : यावेळी आचार्य श्री गुप्ती नंदीजी म्हणाले की, ''आज माझी भेट घेण्यासाठी पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ आले होते. मी राज्याचे मुख्यमंत्री, पालकमंत्री तसेच खासदार या सर्वांना बोलावलं होतं. त्यांनाही बोलवलं होतं आणि आज त्यांनी माझी भेट घेतली. या प्रकरणात कोण आहे, कोण नाही हे मला माहीत नाही. मात्र आज त्यांनी भेट घेतल्यावर मला सांगितलं की, माझा या प्रकरणात काहीच हस्तक्षेप नाही. मी त्यांना सांगितलं की तुम्ही राजा असून आमच्यावर जे अन्याय होत आहे ते पाहता त्यांनी हे व्यवहार रद्द करावा. तेव्हा त्यांनी येत्या काही दिवसात मी हा व्यवहार रद्द करणार असल्याचं त्यांनी मला सांगितलं आहे. येत्या २८ तारखेला धर्मादाय आयुक्त इथं सुनावणी असून संपूर्ण भारतभर जैन समाजाच्या वतीनं एक दिवसीय उपवास ठेवला जाणार आहे. एक तारखेपर्यंत जर व्यवहार रद्द झाला नाही, तर उपोषणाला सुरुवात करणार आहे, असं यावेळी त्यांनी सांगितलं.

## राष्ट्रध्वजाचा अपमान टाळण्यासाठी विराट कोहलीने केलेल्या कृतीचे अनेकांनी केले कौतुक



**सिडनी :** रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या जबरदस्त बॅटिंग भारतानं ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या तिसऱ्या सामन्यात विजय मिळवला आहे. या मॅचमध्ये रोहितनं दमदार शतक झळकावलं, तर विराट कोहलीनं अर्धशतक झळकावून चाहत्यांना खुश केलं. त्यामुळे सध्या सोशल मीडियावर या दोघांचीच जोरदार चर्चा सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर विराट कोहलीचा एक भावनिक व्हिडिओ व्हायरल होत आहे.

चाहत्यांचं हॅन्डशेक स्विकारत असताना एका चाहत्याच्या हातातून भारतीय ध्वज खाली पडला. पण गर्दीतही विराटचं लक्ष लगेच त्या झेंड्याकडे गेलं. त्यानं तत्काळ मागे फिरून खाली वाकत झेंडा उचलला आणि चाहत्याला परत दिला. विराटच्या या देशभक्तीच्या कृतीचं फॅन्सकडून भरभरून कौतुक होत आहे.

हा व्हिडिओ अकाउंटवरून शेअर करण्यात आला आहे. व्हिडिओमध्ये दिसतं की, मैदानातून ड्रेसिंग रूमकडे जात असताना विराट आणि रोहित दोघंही चाहत्यांचं हॅन्डशेक स्विकारत होते. तेव्हाच शिड्या चढताना एका चाहत्याच्या हातून भारतीय ध्वज खाली पडला, आणि विराटनं लगेचच तो उचलून परत दिला. हा प्रसंग पाहून चाहत्यांनी विराटच्या देशप्रेमाचं आणि नम्रतेचं भरभरून कौतुक केलं आहे.

पहिले दोन सामने हरल्यामुळे भारतानं मालिका २-० ने गमावली होती. मात्र, जर तिसरी मॅचही हरली असती, तर व्हाईटवॉश झाला असता. त्यामुळे या सामन्यात भारतीय संघानं अक्षरश: जीव ओतून खेळ खेळला. भारतीय गोलंदाजांनी उत्कृष्ट मारा करत ऑस्ट्रेलियाला फक्त २३६ धावांवर रोखलं, आणि नंतर रोहित-विराटनं अप्रतिम बॅटिंग करत ३८ व्या षटकातच भारताला विजय मिळवून दिला. या सामन्यात रोहितनं १२१ धावा, तर विराटनं ७४ धावा करत १५० पेक्षा जास्त धावांची भागीदारी केली. या जबरदस्त विजयामुळे भारतीय फॅन्स खूष आहेत आणि ''रोहित-विराट जोडी''चं सोशल मीडियावर कौतुक सुरू आहे.

# नुतन वसाहत खुन प्रकरणातील एकास नाशिक येथून घेतले ताब्यात





दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** जालना शहरात नुतन वसाहत येथील रहिवासी नामे विकास प्रकाश लोंढे हा लग्नावरुन घरी जात असतांना गुन्ह्यातील आरोपींनी संगणमत करुन रस्त्यात अडवून जुन्या वादाच्या कारणावरुन जातीवाचक शिवीगाळ करुन रॉड व लाकडी दांड्याने बेदम मारहान करुन खून केला होता.

त्याअनुषंगाने सदर घटना घडताच स्थानिक गुन्हे शाखेचे पथक आरोपींचा शोध घेत असतांना नमुद मुन्ह्यातील आरोपी हा नाशिक येथे रेल्वे स्टेशन परिसरात थांबलेला आहे, अशी माहिती मिळाल्याने नमुद पथकाने नाशिक गुन्हे शाखेस संपर्क करुन आरोपींचे वास्तव्य असलेले ठिकाण सांगून ताब्यात घेणेबाबत कळवून खाजगी वाहनाने तात्काळ नाशिक येथे जाऊन आरोपीस ताब्यात घेतले आहे.

# कार्तिकी यात्रेनिमित्त विठ्ठलाचे २४ तास दर्शन सुरू राजोपचार बंद; भाविकांसाठी अखंड दर्शन व्यवस्था

दैनिक आपला विदर्भ





**पंढरपूर/प्रतिनिधी :** आगामी कार्तिकी यात्रेनिमित्त श्री क्षेत्र पंढरपूर येथे आजपासून श्री विठ्ठल आणि रुक्मिणी मातेचे २४ तास दर्शन सुरू करण्यात आले आहे. या कालावधीत विठ्ठलाच्या सर्व राजोपचारांना तात्पुरती स्थगिती देण्यात आली असून, भाविकांना अखंड दर्शनाची सुविधा मिळणार आहे.

सकाळी मंदिरात पारंपरिक विधीनुसार विठ्ठलाचा पलंग काढण्यात आला, तसेच विठ्ठलाच्या पाठीशी मऊ मखमली लोड देण्यात आला. कार्तिकी यात्रेदरम्यान भाविकांची मोठी गर्दी होत असल्याने, दर्शनात कोणतीही अडचण निर्माण होऊ नये या हेतूने मंदिर समितीने हा निर्णय घेतला आहे.

यावेळी फक्त नित्यपूजा, महानैवेद्य आणि गंधाक्षता हे नियमित धार्मिक विधी पार पडणार असून, राजोपचार जसे की शयन-उठाव इत्यादी तात्पुरते बंद राहणार आहेत. ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर, सह-अध्यक्ष, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती यांनी सांगितले की, कार्तिकी यात्रेदरम्यान भाविकांना २४ तास दर्शन मिळावे, हा उद्देश लक्षात घेऊन विठुरायाचे राजोपचार थांबवले आहेत. विठ्ठल आता दिवस-रात्र भक्तांसाठी उभा राहणार आहे.

२ नोव्हेंबर रोजी पंढरपूरात कार्तिकी एकादशीचा मुख्य सोहळा पार पडणार असून, ९ नोव्हेंबरपर्यंत विठ्ठल-रुक्मिणीचे २४ तास दर्शन सुरू राहणार आहे. दरम्यान, महाराष्ट्रासह देशभरातून लाखो वारकरी पंढरपूरात दाखल होण्यास सुरुवात झाली आहे.

भाविकांच्या सोयीसाठी मंदिर समिती, नगरपालिका व पोलिस प्रशासनाने सुरक्षा, आरोग्य, पाणीपुरवठा, वाहतूक व्यवस्था यांसह सर्वतोपरी तयारी केली आहे.

भाविकांसाठी सावळा विठ्ठल सज्ज आता दिवस-रात्र होणार अखंड दर्शन!

# मेहकर नगरपरिषद निवडणूक: किशोर गारोळे यांचा सामाजिक कार्यातून प्रभाव, नगराध्यक्ष पदासाठी जबरदस्त तयारी

## शिंदे गट अजून उमेदवार निश्चित करताना; मेहकरमध्ये राजकीय थरार, नागरिकांचे लक्ष किशोर गारोळे यांच्यावर

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** प्रतापगडाच्या बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मेहकर शहरातील राजकीय वातावरण आता अत्यंत तापलेले आहे. विधानसभेच्या निवडणुकीत दोन शिवसैनिक आमने-सामने आले, त्यात शिवसेना उद्धव-बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार सिद्धार्थ खरात विजयी झाले. आता त्यांचा प्रभाव नगरपरिषद निवडणुकीतही जाणवणार असून, मेहकरकरांसाठी ही निवडणूक फक्त नगरपरिषद पदाची लढाई नाही, तर दोन शिवसैनिकांच्या राजकीय सामर्थ्याची खरी परीक्षा ठरणार आहे.

नगरपरिषद निवडणुकीत शिवसेना उद्धव-बाळासाहेब ठाकरे पक्षाचे निष्ठावंत, शहर प्रमुख किशोर गारोळे नगराध्यक्ष पदासाठी मैदानात उतरले आहेत. किशोर गारोळे हे शहरातील सर्व धर्मीय समभाव राखणारे, मनमिळाऊ स्वभावाचे आणि सामाजिक कार्यात अग्रेसर नेते म्हणून ओळखले जातात. त्यांनी गरीब, वृद्ध, अपंग आणि गरजू लोकांसाठी अनेक सामाजिक उपक्रम राबवले आहेत. शैक्षणिक सहाय्य, आरोग्य मोहिमा, अन्न व औषध पुरवठा, तसेच आपत्ती व्यवस्थापन या सर्व क्षेत्रात त्यांनी महत्त्वाची कामगिरी केली आहे.



किशोर गारोळे यांचा प्रभाव इतका प्रचंड आहे की शहरातील राजकीय विश्लेषक त्यांना नगराध्यक्ष पदासाठी सर्वाधिक प्रभावी उमेदवार मानत आहेत. विविध समुदायांमध्ये त्यांचा विश्वास आणि लोकप्रियता प्रगाढ असून, नागरिक त्यांच्यावर पूर्ण भरोसा ठेवतात. त्यांच्या सामाजिक कार्यामुळे नागरिकांच्या हृदयात त्यांचे विशेष स्थान निर्माण झाले आहे.

दुसरीकडे, शिंदे गट अजून आपला उमेदवार निश्चित करताना अडचणीत आहे. किशोर गारोळे यांना फाईट देणारा चेहरा कोण असेल, हे अजून स्पष्ट नाही. त्यामुळे मेहकरमध्ये राजकीय समीकरणे काहीशी बदलण्याची चिन्हे दिसत आहेत.

सिद्धार्थ खरात यांचा अनुभव आणि संसदीय राजकीय प्रभाव किशोर गारोळे यांच्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे. नगरपरिषद निवडणुकीत असा अनुभव आणि धोरणात्मक मार्गदर्शन किशोर गारोळे यांना इतर उमेदवारांवर मोठा फायदा देईल, अशी मत मांडली जात आहेत.

शहरातील नागरिक म्हणतात की, किशोर गारोळे यांचा पारड आता जड झाला आहे, आणि ते नगरपरिषद निवडणुकीत निर्णायक ठरणार आहेत. त्यांचे नेतृत्व, सामाजिक कार्य आणि सर्व धर्मीय समभाव ह्या घटकांमुळे शहरातील नागरिक त्यांच्यावर पूर्ण विश्वास ठेवत आहेत.

शहरातील राजकीय वातावरण आता उग्र होत असून, दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते आणि समर्थक आपापल्या बाजूने प्रचाराला सुरुवात करत आहेत. शहरातील नागरिकांच्या दृष्टीने किशोर गारोळे हे नगराध्यक्ष पदासाठी अत्यंत सक्षम आणि प्रभावी उमेदवार आहेत. येत्या निवडणुकीत त्यांच्या नेतृत्वाखाली मेहकरमध्ये सामाजिक कार्यावर आधारित नवी दिशा निर्माण होण्याची शक्यता आहे.

सारांश म्हणून, मेहकर नगरपरिषद निवडणूक किशोर गारोळे यांच्या सामाजिक कार्यातून सिद्ध झालेल्या नेतृत्वाखाली शहरासाठी निर्णायक टप्पा ठरणारी आहे. राजकीय समीकरणे या लढतीमुळे बदलू शकतात, आणि मेहकरकरांचा लक्ष येत्या नगरपरिषद निवडणुकीकडे लागले आहे.

## विविध वृत्त...

### नवनीत राणा आणि रवी राणा यांनी यशोमती ठाकूर यांना दिवाळीचा किराणा पाठवला, यशोमती ठाकूर यांची प्रतिक्रिया





दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** शेतकरी आत्महत्या करत आहेत, शेती कोरडी पडली आहे आणि लोक संकटात आहेत. अशा वेळी आम्ही शेतकऱ्यांच्या दु:खात सहभागी होऊन काळी दिवाळी साजरी केली. तुम्हाला जर खरंच समाजासाठी काही करायचं असेल, तर किराणा पाठवण्याचा दिखावा न करता शेतकऱ्यांना मदत करा आणि जर पुन्हा असा कुचेष्टापूर्ण प्रकार करण्याची हिंमत दाखवली, तर त्याचं सडेतोड उत्तर दिलं जाईल. जनतेच्या भावनांचा अपमान करून राजकारण करणाऱ्यांना अमरावतीकर कधीच माफ करणार नाहीत. राणा दाम्पत्याने आपली राजकीय नाटकबाजी थांबवावी, नाहीतर लोकच त्यांना योग्य जागा दाखवतील.

### डोणगाव पोलिसांकडून अमानुष मारहाण प्रकरण सामाजिक संघटनांचा निषेध




दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** डोणगावजवळील ग्राम बेलगाव येथील रवि परसराम ठाकरे यांना पोलिसांनी केलेल्या अमानुष मारहाणीप्रकरणी संबंधित दोषी पोलीस कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी विविध सामाजिक संघटनांच्या वतीने करण्यात आली आहे. या संदर्भात दि. २५ ऑक्टोबर रोजी डोणगाव पोलीस स्टेशनला निवेदन देण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, रवि ठाकरे यांनी उसतोडीच्या कामासाठी घेतलेल्या इसार रकमेच्या प्रकरणी झालेल्या गैरसमजातून, रंगराव पाटील यांच्या सांगण्यावरून डोणगाव पोलीस स्टेशनमध्ये रवि ठाकरे यांना बोलावण्यात आले. त्यानंतर चार ते पाच पोलीस कर्मचाऱ्यांनी न्यायालयाची कोणतीही परवानगी न घेता व वरिष्ठ अधिकाऱ्यांना न कळविता मारहाण केली, असा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या अमानुष मारहाणीमुळे रवि ठाकरे यांची मानसिक स्थिती बिघडली असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.संघटनांच्या प्रतिनिधींनी निवेदनात म्हटले आहे की, या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी पोलीस कर्मचाऱ्यांवर योग्य ती कारवाई करावी, अन्यथा सामाजिक संघटनांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

सदर निवेदनावर विविध सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या असून, या प्रकरणी न्याय मिळावा आणि जबाबदार पोलिस कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी, अशी एकमुखी मागणी करण्यात आली आहे.

## केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची अतिसारग्रस्त पिंप्री माळेगावला भेट; शुद्ध पाणीपुरवठ्यासाठी तातडीचे निर्देश





दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी:** बुलडाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यातील पिंप्री माळेगाव (अडगाव) येथे दूषित पाण्यामुळे अतिसाराचा प्रादुर्भाव झाल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी २५ ऑक्टोबर रोजी गावाला भेट दिली. त्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधत परिस्थितीचा आढावा घेतला आणि गावाला तात्काळ शुद्ध पाणीपुरवठा करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणेला दिले.

सुमारे दोन हजार लोकसंख्या असलेल्या या गावाला वाण धरणातून १४० गाव पाणीपुरवठा योजनेद्वारे पाणी पुरवठा होत आहे. मात्र या योजनेतील पाइपलाइन लिकेज झाल्यामुळे सार्वजनिक विहिरीत दूषित पाणी मिसळल्याने गावातील अनेक नागरिकांना अतिसार व पोटदुखीचा त्रास झाला होता.

या परिस्थितीची माहिती मिळताच केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी तातडीने गावाला भेट देऊन अधिकाऱ्यांसह परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेतला. त्यांनी पाईपलाइन दुरुस्तीचे काम त्वरित पूर्ण करून शुद्ध पाणी नळाद्वारे पुरवण्याचे आदेश दिले.

तसेच नागरिकांना तात्पुरत्या स्वरूपात स्वच्छ पाणी उपलब्ध करून देण्यासाठी दोन सिंटेक्स टाक्या बसवण्याचे निर्देश संग्रामपूरच्या गटविकास अधिकाऱ्यांना देण्यात आले. राज्यमंत्री जाधव यांनी हनुमान मंदिरात ग्रामस्थांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या व नंतर गावातील पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीची पाहणी केली.

या भेटीदरम्यान शिवसेना सहसंपर्क प्रमुख श्री. शांताराम दाणे, जिल्हाप्रमुख श्री. संतोषराव डिवरे, उपविभागीय अधिकारी श्री. काळे, तहसीलदार श्री. प्रशांत पाटील, आरोग्य अधिकारी श्री. मारोडे, माजी जिल्हा परिषद सदस्य श्री. राजू पाटील ठाकरे, युवासेना लोकसभा अध्यक्ष श्री. चेतन पाटील, तसेच तालुका प्रमुख श्री. केशव ढोकणे, शहरप्रमुख श्री. संतोष लिप्ते आणि महायुतीचे विविध पदाधिकारी तसेच ग्रामविकास, महसूल व आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## जनतेच्या दारी प्रशासन! आमदार सिद्धार्थ खरात यांचा जनता दरबार ३१ ऑक्टोबरला



दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकरलोणार मतदारसंघातील जनतेच्या प्रश्नांना थेट न्याय मिळवून देण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार सिद्धार्थ खरात यांच्या पुढाकारातून ''जनता दरबार'' आयोजित करण्यात आला आहे.

हा जनता दरबार गुरुवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता, कृषी वैभव प्राईड (के. व्ही. प्राईड हॉल), मेहकर येथे पार पडणार असून, तालुका स्तरावरील सर्व शासकीय अधिकारी या ठिकाणी उपस्थित राहणार आहेत.

नागरिकांना आपल्या तक्रारी, अडचणी आणि मागण्या थेट अधिकाऱ्यांसमोर मांडण्याची संधी या दरबारातून मिळणार आहे. या संदर्भात आमदार खरात म्हणाले, जनतेच्या दारात प्रशासन पोहोचविणे आणि लोकांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकून त्वरित तोडगा काढणे, हा माझा उद्देश आहे. मेहकरलोणार मतदारसंघातील प्रत्येक नागरिकाच्या सेवेसाठी मी सदैव तत्पर आहे.

दरम्यान, नागरिकांनी आपली तक्रार किंवा मागणी लेखी स्वरूपात दोन प्रतींमध्ये, २९ ऑक्टोबरपूर्वी आमदार सिद्धार्थ खरात यांच्या जनसंवाद कार्यालयात (डोणगाव रोड, मेहकर) सादर करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रशासन आणि जनतेमधील थेट संवादातूनच विकासाचा मार्ग मोकळा होतो. मेहकर तालुक्यातील सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आमदार सिद्धार्थ खरात यांनी केले आहे.

## बंद घरावर चोरट्यांनी मारला डल्ला, ५० हजार रुपये लंपास; डोणगाव पोलिसांत गुन्हा दाखल

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** डोणगाव पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या शेलगाव देशमुख गावात बंद घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी ५० हजार रुपये रोख रक्कम लंपास केल्याची घटना घडली आहे. दिवाळीच्या सुट्टीचा फायदा घेत चोरट्यांनी घरफोडी केली असून, या घटनेमुळे परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी नवले या १८ ऑक्टोबर ते २५ ऑक्टोबर या कालावधीत मेहकर येथे मुलीकडे गेल्या होत्या. त्यांच्या अनुपस्थितीत अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराचे कुलूप तोडून प्रवेश केला. घरातील लोखंडी पेटी फोडून त्यातील रोख ५० हजार रुपये असा ऐवज लंपास करण्यात आला.

निर्मला नवले या परत आल्यानंतर घरफोडीची घटना उघडकीस आली. त्यांनी तत्काळ डोणगाव पोलिस स्टेशन येथे तक्रार दाखल केली. त्यावरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवला असून, पुढील तपास सुरू आहे.

घटनेनंतर बुलढाणा येथून फॉरेन्सिक टीम व डॉग स्क्वॉड बोलावण्यात आले होते. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून ठसे आणि पुरावे गोळा केले आहेत. दरम्यान, सणासुदीच्या काळात बंद घरे चोरट्यांच्या रडारवर येत असल्याचे दिसून येत असून, घर बंद ठेवताना सुरक्षितता उपाय अवलंबावेत, मौल्यवान वस्तू सुरक्षित ठिकाणी ठेवाव्यात आणि पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन पोलिसांनी नागरिकांना केले आहे.

# डोणगाव निवडणुकीत विकासाचा मुद्दा ऐरणीवर

## पाणीपुरवठा आणि अंगणवाडींच्या कामांवर जनतेचा रोष!

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची रणधुमाळी डोणगाव परिसरात जोर धरू लागली आहे. प्रत्येक पक्ष आपापले गणित मांडत असून, अनुभवी नेत्यांसह नव्या पिढीतील तरुण उमेदवारही सक्रिय झाले आहेत. मात्र या वेळी पक्षनिष्ठेपेक्षा विकासाचा मुद्दा अग्रस्थानी राहणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

गेल्या अनेक वर्षांपासून डोणगाव परिसरातील विकासकामांबाबत प्रश्नचिन्ह कायम आहे. विशेषतः २०१३-१४ मध्ये सुरू झालेली



डोणगाव पाणीपुरवठा योजना आजही अपूर्ण आहे. या योजनेद्वारे गावाला शाश्वत पाणीपुरवठा होईल, अशी अपेक्षा नागरिकांची होती. मात्र योजना अद्याप कार्यान्वित न झाल्याने लोकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. उन्हाळ्यात पाण्याची टंचाई निर्माण होते आणि काही भागात आजही टँकरवर अवलंबून रहावे लागते, ही वस्तुस्थिती नागरिकांच्या त्रासाचे चित्र स्पष्ट करते.

पाण्याबरोबरच स्थानिक रस्त्यांची दुरवस्था हा दुसरा ज्वलंत मुद्दा ठरतो आहे. गावातील अनेक रस्ते खड्डेमय झाले असून, पावसाळ्यात या रस्त्यावर चालणेही कठीण होते. अंगणवाडी केंद्रांच्या समस्याही गावकऱ्यांच्या चर्चेचा विषय ठरल्या आहेत. काही केंद्रे अद्याप अपुऱ्या इमारतींमध्ये चालवली जात असून, मुलांच्या सुविधांबाबत पालकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. स्थानिकांच्या मते, लहान बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी मूलभूत सुविधा आवश्यक असताना त्या मिळत नाहीत.

स्थानिक नागरिक व युवा वर्ग यांच्या चर्चेतून एक गोष्ट ठळकपणे समोर येत आहे या वेळी निवडणूक केवळ राजकारणापुरती मर्यादित न राहता, विकासाच्या मुद्द्यांवर लढवली जाणार आहे. ''आम्हाला आश्वासने नकोत, कृती हवी,'' असा जनतेचा ठाम सूर आहे.

डोणगाव सर्कलमध्ये विविध राजकीय पक्षांचे नेते आणि संभाव्य उमेदवार मतदारांशी संपर्क साधत आहेत. कोण उमेदवार अपूर्ण कामांवर ठोस भूमिका घेतो आणि प्रत्यक्ष कृती आराखडा मांडतो, हे पाहण्यासाठी मतदार आतुर झाले आहेत.

आगामी काही दिवसांत उमेदवारांची यादी जाहीर होताच प्रचार अधिक रंगतदार होण्याची शक्यता आहे. मात्र एक गोष्ट स्पष्ट आहे या वेळी डोणगावमध्ये मतदानाचे गणित नव्हे, तर विकासाचे समीकरण निर्णायक ठरणार आहे.